CMYK

मालमत्ता अन् कर्ज व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कंपनीची स्थापना >> पान 2

माता रमाबाई आंबेडकर व कामराज नगर झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्वतःच्या घरांत राहण्याचे स्वप्न दोन वर्षात पूर्ण होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 3

शेतकऱ्यांच्या समस्या दुर्लक्षित; बच्चू कडूंचा सरकारवर आरोप >> पान 4

**सुविचार**

आपल्या कुटुंबाला नेहमी प्राधान्य द्या.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 78 ■ बुधवार, दि. 15 ऑक्टोबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



अमृता रावने सांगितला काळ्या जादूचा किस्सा: अभिनेत्री म्हणाली- ३ मोठे चित्रपट गमावले

आतील पान

# वडिलांपेक्षा मुलगा वयाने मोठा कसा?

## सर्वपक्षीय शिष्टमंडळाची निवडणूक आयोगासमोर प्रश्नांची सरबत्ती, राज ठाकरेंच्या प्रश्नांनी वेधले लक्ष





मुंबई : महाविकास आघाडी आणि मनसे यांची एक नव्हे तर दोन शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाची भेट घेतली. यातील एक शिष्टमंडळ मुख्य अधिकाऱ्यांना भेटलं तर दुसरं शिष्टमंडळ राज्य निवडणूक आयोगाला भेटलं आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीनंतर आता महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्था या निवडणुका लागणार आहेत. त्याच्या पार्श्र्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया निकालाच्या अडचणी आणि मतदार यादीमधील घोळ यावरती या बैठकीमध्ये चर्चा झाली आहे.

आगामी महानगरपालिका आणि स्वराज्य संस्था निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पाडाव्या यासाठी ही भेट घेतली आहे आणि महाविकास आघाडीसह मनसेच्या शिष्टमंडळातील राज ठाकरे, उद्धव ठाकरे, शेकापचे जयंत पाटील, शरद पवार, जयंत पाटील, हे प्रमुख नेते महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस. चोकलिंगम यांना भेटले.

तर यातील एक शिष्ट मंडळ सीईओंच्या भेटीला गेले आहे. दुसरशिष्टमंडळ अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात भेटून आले आहे. या बैठकीमध्ये महाविकास आघाडीसह राज्यातील इतर विरोधी पक्षातील प्रमुख नेते देखील उपस्थित होते. चोकलिंगम यांच्या बैठकीला शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, संदीप देशपांडे, जयंत पाटील हे देखील उपस्थित होते. शेकापचे जयंत पाटील, जयंत पाटील काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात वर्षा गायकवाड यादेखील उपस्थित होत्या. आज सर्वपक्षीय शिष्टमंडळ निवडणूक आयोगांच्या मुख्य अधिकाऱ्यांचे भेट घेणार आहे तसेच दुसरे एक शिष्टमंडळ राज्य निवडणूक आयोगाचे दिनेश वाघमारे यांची भेट घेणार आहे, अशी माहिती ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दिली होती. दिनेश वाघमारे यांची भेट घेणाऱ्या शिष्टमंडळामध्ये अंबादास दानवे यांचे हे शिष्टमंडळ आयोगाच्या भेटीला गेले होते. शिष्टमंडळांनी भेटीवेळी निवडणूक अधिकाऱ्यांना एक निवेदन दिले असून त्यातूनही काही खरमरीत सवाल विचारण्यात आले. सर्व पक्षाचे शिष्टमंडळ आज सगळे एकत्र आले. सगळेजण राज्य मुख्यनिवडणूक अधिकारी यांच्या सोबत बैठक घेतली.

>> पान २

## मुंबईकरांसाठी महसूल विभागाची दिवाळी भेट, दस्त नोंदणी संदर्भात घेतला मोठा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील नागरिकांसाठी दस्त नोंदणीसंबंधी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. आता मुंबईतील कोणत्याही म ुद्रांक कार्यालयात लोक आपली दस्त नोंदणी करू शकतील. यासाठी आधी असलेली क्षेत्रीय मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे. राज्य सरकारने या सुधारणेबाबत अधिकृत निर्णय जाहीर केला असून यामुळे नागरिकांचा वेळ आणि धावपळ दोन्ही वाचेल. तसेच म्हणजे कार्यालयीन कामकाज आणि निर्णय प्रक्रियाही जलद होईल. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या क्षेत्रीय अटी रद्द करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला असून या निर्णयाचा फायदा लाखो मुंबईकरांना होणार आहे.

मुंबई आणि मुंबई उपनगरातील नागरिक, व्यावसायिक, कंपनी मालक आता त्यांच्या मालमत्ता करार, भाडे करार, वारसा हक्कपत्र यासह अन्य महत्त्वपूर्ण कागदपत्रांची दस्त नोंदणी त्यांच्या क्षेत्रासंबंधित कार्यालयापुरती मर्यादित न राहता मुंबईतील कोणत्याही सहा मुद्रांक कार्यालयात करू शकतील. या सहा कार्यालयांमध्ये बोरिवली, कुर्ला, अंधेरी, मुंबई शहर तसेच ओल्ड कस्टम हाऊस जवळील प्रधान मुद्रांक कार्यालयातील जिल्हाधिकारी कार्यालयांचा समावेश आहे. यामुळे नागरिकांना विविध कार्यालयांमध्ये धावपळ करण्याची गरज नाही आणि नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होईल.

या सहा कार्यालयांमध्ये बोरिवली, कुर्ला, अंधेरी, मुंबई शहर तसेच ओल्ड कस्टम हाऊस जवळील प्रधान मुद्रांक कार्यालयातील जिल्हाधिकारी कार्यालयांचा समावेश आहे. यामुळे नागरिकांना विविध कार्यालयांमध्ये धावपळ करण्याची गरज नाही आणि नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद होईल.

या निर्णयामुळे व्यवसायिक आणि कंपनी मालकांसह घरकुलधारकांचेही कामकाज सुलभ होईल. पूर्वी नागरिकांना केवळ त्यांच्या स्थानिक मुद्रांक कार्यालयात जावे लागत असे जे अनेकदा वेळखाऊ आणि त्रासदायक ठरत असे. आता ही अट रद्द झाल्यामुळे दस्त नोंदणी प्रक्रिया अधिक लवचिक आणि सोपी झाली आहे.

## कार्यकर्त्यांना संधी; जि.प. मध्ये ५ अन् पंचायत समितीमध्ये २ स्वीकृत सदस्य घेणार? मुख्यमंत्र्यांना पत्र





**मुंबई/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी विनंती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे, या सुधारणेनंतर ग्रामविकासात्मक प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी

>> पान २

## दिवाळीच्या तोंडावर पुन्हा वादळी पावसाचे संकट ; राज्यात १५ ऑक्टोबरपासून या भागात

**अकोला/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे कोरडे आहे. नैऋत्य मोसमी पावसाने राज्यातून निरोप घेतला. मात्र, १५ ऑक्टोबरपासून राज्यातील हवाम ानात परत एकदा बदल अपेक्षित आहे. या तारखेपासून किमान १८ ऑक्टोबरपर्यंत विदर्भ, म राठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आभाळी हवामान आणि दुपार नंतरचा वादळी पाऊस अपेक्षित असल्याचे हवामान विभागाकडून स्पष्ट करण्यात आले. या पार्श्र्वभूमीवर प्रशासनाने शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

राज्यात यंदा पावसाने धुमाकूळ घातला. अनेक भागात अतिवृष्टी होऊन पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांची उभे पिके पाण्यात वाहून गेली असून अतोनात नुकसान झाले. सध्या मोसमी पावसाने राज्यात निरोप घेतला आहे. पूरपरिस्थितीतून सर्व जण सावरत असतांना आता पुन्हा एकदा अवकाळीचे संकट निर्माण झाले. सध्याच्या अंदाजानुसार वादळी पावसाची सर्वात अधिक शक्यता आणि प्रमाण हे विदर्भ आणि मराठवाड्यात असू शकते.

# मेहकर–लोणार: जिल्हा परिषद निवडणुकीतील निर्णायक रणभूमी

## आरक्षण जाहीर झाले; खरी लढाई आता राजकीय समीकरणांच्या कसोटीवर!

**बुलढाणा : जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर झाल्यानंतर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. आरक्षण ही फक्त निवडणुकीची सुरुवात असून, खरी लढाई आता सुरू झाली आहे. महायुती, महाविकास आघाडी आणि इतर घटक पक्ष युती करतील की स्वतंत्र लढतील हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. या अनिश्चिततेमुळे इच्छुक उमेदवारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, पक्षांवर रणनीती ठरविण्याचा दबावही वाढला आहे.**





### ■ मेहकर तालुक्याचे बदलते राजकीय समीकरण

मेहकर तालुका जिल्ह्यातील राजकीय दृष्टीने नेहमीच प्रभावी ठरला आहे. मागील ३५ वर्षांपासून सत्ता शिवसेनेच्या ताब्यात होती, त्यामुळे तालुक्यात स्थैर्य होते. मात्र विधानसभेतील बदललेले चित्र आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वामुळे आता या पारंपरिक समीकरणात बदलाचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

आमदार खरात यांच्या सक्रियतेमुळे आणि स्थानिक विकासकामांमुळे जनतेचा झुकाव उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडे होत आहे. हा बदल आगामी निवडणुकीतील महत्त्वाचा घटक ठरू शकतो.

दरम्यान, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे मेहकरचे असल्यामुळे त्यांचा प्रभाव, जनतेशी असलेला संवाद आणि निर्णयक्षम वृत्ती यामुळे स्थानिक राजकारण अधिकच गतिमान झाले आहे. ते केवळ नेते नसून, पक्ष आणि जनतेत संतुलन राखणारे राजकीय व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात.

स्थानिक लोकप्रतिनिधी बदलल्यामुळे जनतेचा दृष्टिकोन बदलला असून, महाविकास आघाडीसमोरील आव्हाने आणि संधी दोन्ही वाढल्या आहेत.

### ■ लोणार तालुकेचे निर्णायक महत्त्व

मेहकरप्रमाणेच लोणार तालुका देखील जिल्हा परिषद निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. या दोन तालुक्यांतील मतदारसंख्या आणि राजकीय स्थैर्य यामुळे, येथे होणारे निकाल जिल्ह्याच्या राजकीय समीकरणावर थेट परिणाम करणार आहेत.

स्थानिक नेत्यांची छबी, युतींचे गणित आणि मतदारांचा मूड हे सर्व घटक युती ठरविण्यात निर्णायक ठरणार आहेत. लोणारमध्ये मागील निवडणुकांमध्ये काही पक्षांची पकड स्थिर होती, मात्र स्थानिक नेतृत्वातील बदल आणि जनतेच्या बदलत्या दृष्टिकोनामुळे यावेळी परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे.

### ■ युती, बंड आणि इच्छुक उमेदवारांची गर्दी

जिल्हा परिषद निवडणुकीत युतीसंदर्भात परिस्थिती गुंतागुंतीची आहे. पक्षांच्या युती जर झाल्या तर बंड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे; आणि जर युती झाली नाही, तर स्पर्धा चुरशीची होणार हे निश्चित आहे.

इच्छुक उमेदवारांची वाढती संख्या ही परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवत आहे. प्रत्येक पक्ष आपली ताकद, जनतेशी असलेला संबंध आणि तालुक्यातील स्थैर्य लक्षात घेऊन निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

शिवसेना (शिंदे गट), भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर घटक पक्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचले आहेत. प्रत्येक पक्षाची रणनीती, इच्छुक उमेदवारांचा दबाव आणि स्थानिक समीकरण या सर्वांचा परिणाम अंतिम युतीच्या निर्णयावर होणार आहे.

### ■ महाविकास आघाडीची कसोटी

महाविकास आघाडीच्या दृष्टीने ही निवडणूक महत्त्वाची ठरत आहे. मेहकरमध्ये आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वाखाली उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला मिळत असलेला प्रतिसाद हा एक सकारात्मक संकेत आहे. मात्र, आघाडीतील समन्वय आणि स्थानिक पातळीवरील समजूतदारी साधणे हे मोठे आव्हान आहे.

युती झाली किंवा न झाली, तरी त्याचा थेट परिणाम पुढील राजकीय स्थैर्यावर होणार आहे. आघाडीला जनतेच्या अपेक्षांना उत्तर देण्यासाठी ठोस रणनीती आखावी लागेल.

### ■ जनतेचा बदलता दृष्टिकोन

स्थानिक नेते आणि पक्षातील बदलांमुळे मतदारांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या प्रभावामुळे मतदारांचा दृष्टिकोन अधिक सजग आणि अपेक्षाभिमुख झाला आहे. त्यामुळे दोन्ही तालुक्यांतील मतदार आता पक्षांकडे नव्या नजरेने पाहत आहेत.

मेहकर आणि लोणार या दोन तालुक्यांतील निकाल जिल्हा परिषद निवडणुकीचे भवितव्य ठरवतील. मतदारांचा मूड आणि स्थानिक समीकरण ओळखणे हे आता प्रत्येक पक्षासाठी आवश्यक झाले आहे.

आरक्षण जाहीर झाले असले तरी खरी लढाई आता सुरू झाली आहे. मेहकर–लोणार ही दोन्ही तालुके जिल्ह्यातील निर्णायक रणभूमी ठरत आहेत. स्थानिक समीकरणे, युतीचे गणित, नेत्यांची छबी आणि जनतेचा मूड या सर्व घटकांवर पुढील राजकीय दिशा अवलंबून राहणार आहे.

**एकंदरीत, जिल्हा परिषद निवडणूक आता ''आरक्षण जाहीर झाले, पण खरी लढाई सुरू झाली'' अशा टप्प्यावर पोहोचली आहे. मेहकर–लोणार या दोन तालुक्यांचे निकालच जिल्ह्याचे राजकीय भविष्य ठरवतील**



देविदास खनपटे
मुख्य संपादक

CMYK

>> पान २

## वाचन प्रेरणा दिन

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत. आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे. वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

# मालमत्ता अन् कर्ज व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कंपनीची स्थापना

## आर्थिक स्थिरता आणण्यासाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य सरकारकडून आर्थिक स्थिरता आणण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारकडून मालमत्ता आणि कर्ज व्यवस्थापनासाठी स्वतंत्र कंपनीची स्थापना करण्यात आली आहे. 'MAHA ARC LIMITED' कंपनी स्थापन करण्यास राज्य सरकारकडून मंजुरी दिली. राज्य शासनाच्या मालमत्ता, गुंतवणूक, आणि आर्थिक साधनांचा पुनर्वापर आणि पुनर्रचना करण्याचे काम करणार आहे. राज्याच्या मालमत्तेचा अधिक चांगला आर्थिक उपयोग करण्यासाठी ही कंपनी मध्यस्थी आणि व्यवस्थापन करणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकोषीय स्थैर्यासाठी आणि दीर्घकालीन आर्थिक नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचं पाऊल आहे. अनेक मालमत्ता आणि आर्थिक साधनं निष्क्रिय आहेत किंवा त्यांचा उपयोग कमी प्रमाणात केला जातो, त्यामुळे शासनाला या संसाधनांवरून अपेक्षित परतावा मिळत नाही. अशात ह्या कंपनीच्या मार्फत त्याचे विनियोजन केले जाणार आहे. कंपनीच्या स्थापनेसाठी वित्त आणि नियोजन विभागातील आयएएस अधिकाऱ्यांची नियुक्ती अपर मुख्य सचिव (वित्त) मनोज सौनिक, प्रधान सचिव (व्यय) ओमप्रकाश गुप्ता, प्रधान सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, सचिव (वित्तीय सुधारणा) शेला ए., तसेच इतर सहसचिव आणि उपसचिव स्तरावरील अधिकाऱ्यांचा समावेश असणार आहे.



**राज्य सरकारची असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी काय काम करणार?**

राज्याची मालमत्ता व्यवस्थित, पारदर्शक आणि व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापित करणार

निष्क्रिय किंवा अकार्यक्षम मालमत्तांचा आर्थिक पुनर्वापर करणार

शासनाच्या कर्ज आणि देणींचे संतुलन साधणार

राज्याच्या मालमत्तांचा उपयोग वाढणार, सोबतच निष्क्रिय संपत्ती आर्थिकदृष्ट्या सक्रिय होईल

नवीन निधी उभारणीस मदत होणार, सोबतच सरकारला भांडवली बाजारातून पैसा उभारता येणार

कर्ज व्यवस्थापन सुधारणार आणि जुन्या कर्जांचे पुनर्विलोकन करून वित्तीय ताण कमी करता येणार

सरकारला अप्रत्यक्षरीत्या अधिक महसूल मिळू शकतो, ज्यात राजस्व वाढण्यास मदत

# कॉ. गोविंद पानसरे हत्या प्रकरण : मुख्य आरोपी वीरेंद्र तावडेसह दोघांना जामीन

**दैनिक आपला विदर्भ**

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्येप्रकरणातील मुख्य आरोपीसह इतर दोन जणांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. कोल्हापूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचने मंगळवारी (दि. १४) हा निर्णय दिला. या प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, अमोल काळे आणि शरद कळसकर या तिघांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांच्या खंडपीठाने दिलेल्या या निर्णयामुळे, या बहुचर्चित प्रकरणातील सर्व १२ आरोपी आता जामिनावर असल्याचं स्पष्ट झालं आहे.

न्यायालयाने तिन्ही आरोपींना जामीन मंजूर केला असला तरी, शरद कळसकर याची सुटका होणार नाही. कारण २०१३ मधील डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणी त्याला दोषी ठरवण्यात आले असून, सध्या त्याच्या शिक्षेविरोधातील अपील उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. यामुळे कळसकर मात्र शिक्षा पूर्ण होईपर्यंत तुरुंगातच राहणार आहे.

मंगळवारी झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती दिघे यांनी सांगितले की, आरोपींनी दाखल केलेले जामिनाचे अर्ज मंजूर करण्यात येत आहेत; सविस्तर आदेश नंतर दिला जाईल.

२० फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूरमध्ये गोविंद पानसरे यांच्यावर गोळीबार करून त्यांची हत्या केली. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास महाराष्ट्र पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) केला, नंतर केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) ही चौकशी सोपवण्यात आली. मात्र, आज १० वर्षांहून अधिक काळ उलटून गेल्यानंतरही न्यायालयीन निकाल लागलेला नाही.

डॉ. वीरेंद्रसिंह तावडेचे नाव पानसरेच नव्हे, तर डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातही आले होते. २०१८ मध्ये कोल्हापूर न्यायालयाने पानसरे प्रकरणात त्याचा जामीन मंजूर केला होता, मात्र दाभोलकर प्रकरणात तेव्हाही तो कारागृहातच होता. १० मे २०२४ रोजी दाभोलकर प्रकरणात निर्दोष सुटल्यावर तावडे कारागृहातून बाहेर आला. मात्र, कोल्हापूर जिल्हा न्यायालयाने १६ जुलै २०२४ रोजी पानसरे प्रकरणातील त्याचा जामीन रद्द केला. अखेर, आज उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचकडून पुन्हा जामीन मंजूर झाला आहे. या प्रकरणातील इतर ९ आरोपींना यापूर्वीच जामीन मिळाला होता. त्यात सचिन अंदुरे, गणेश मिस्कीन, अमित डेगवेकर, भरत कुरणे, अमित बद्दी, वासुदेव सूर्यवंशी आणि समीर गायकवाड यांचा समावेश आहे. आता सर्व आरोपी जामिनावर सुटल्याने तपास आणि न्यायालयीन सुनावणीची पुढील दिशा काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# पुणे, कोल्हापूर, सातारा, परभणी, अहिल्यानगर, वसई-विरार येथील विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे, कोल्हापूर, सातारा, परभणी, अहिल्यानगर, वसई-विरार येथील काँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादी, उबाठा गट, बहुजन विकास आघाडी आणि मनसे मधून सरपंच, पदाधिकारी, माजी नगरसेवक आणि शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये मंगळवारी प्रवेश केला. वसईचे बविआचे माजी नगरसेवक प्रदीप पवार, नंदकिशोर पवार, परभणीचे आबासाहेब पतंगे, कराडच्या माजी नगरसेविका स्मिता हुलवान यांच्यासह अनेकांनी भाजपामध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, आ. ड. राहुल कुल, आ. डॉ. राहुल आवाडे, आ. मोनिका राजळे, आ. अतुलबाबा भोसले, आ. स्नेहा पंडीत दुबे, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, परभणी जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यावर, दूरदृष्टीवर विश्वास ठेवत परिवर्तन आणि विकास यासाठी या सर्वांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. वसई, विरार, नालासोपारा भागातील जनता कायम राष्ट्रीयत्वाच्या विचारधारेसोबत राहिली आहे. केंद्र आणि राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक विचाराचे सरकार असेल तर विकासाची नवी उंची गाठणे शक्य होते. म्हणूनच सुजाण जनतेने महापालिका निवडणुकीत भरभरून मते द्यावी हे आवाहन श्री. चव्हाण यांनी केले. पायाभूत सुविधा विकास, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी, परिसराचा कायापालट करण्यासाठी महायुतीचा महापौर गरजेचा आहे असेही त्यांनी नमूद केले.

भाजपात प्रवेश केलेल्यांमध्ये पुणे जिल्ह्यातील शरद पवार गटाचे माजी जि.प. सदस्य शेखर पाचुंदकर पाटील, स्वाती पाचुंदकर पाटील, दत्ता पाचुंदकर पाटील, राहुल पवार,रांजणगाव देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त ओंकार देव, सरपंच चित्तरंजन गायकवाड, गौरी गायकवाड आदींचा समावेश आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष जीवन बरगे, प्रदेश चिटणीस व माजी पाणीपुरवठा सभापती विठ्ठल चोपडे, माजी नगरसेविका व माजी आरोग्य सभापती शुभांगी माळी, माजी नगरसेवक तानाजी हराळे, राजू खोत, माजी नगरसेविका दीपाली हुक्कीरे, काँग्रेसचे माजी उपनगराध्यक्ष रवि रजपूते यांनी तर सातारा जिल्ह्यातील काँग्रेस आणि स्वाभिमानी पक्षाचे कराडच्या माजी नगरसेविका आणि विरोधी पक्ष नेत्या स्मिता हुलवान, माजी नगरसेवक आणि माजी बांधकाम सभापती राजेंद्र माने, इंद्रजीत गुजर, संजय कांबळे यांचा भाजपा मध्ये प्रवेश केलेल्यांत समावेश आहे.

भाजपात प्रवेश केलेल्यांमध्ये वसई-विरार येथील बहुजन विकास आघाडीचे नगरप्रमुख नंदकिशोर पवार, नवदुर्गा सार्वजनिक युवा संघटक अध्यक्ष साईराज पवार, विशाल नगरचे अध्यक्ष प्रकाश जाधव, दैनिक चौफेर संघर्षचे संपादक कैलास रांगणेकर, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ विशाल नगरचे सचिव भार्गव घाडी, दिव्य मानसचे संपादक सुधीर चौधरी आदींचा समावेश आहे.

पान १ वरून...

## वडिलांपेक्षा मुलगा

दुसर शिष्टमंडळ अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात भेटून आले आहे. उद्या चोकलिंगम आणि वाघमारे यांच्यात एकत्रित बैठक होणार आहे. उद्या पुन्हा चर्चा होणार आहे. त्यामुळे उद्या पत्रकार परिषद होईल. आज पत्रकार परिषद होणार नाही असं महाविकासआघाडी आणि मनसेकडून सांगण्यात आलं आहे.

**बैठकीत कोण काय बोललं?**

विरोधकांचे केंद्रीय निवडणूक आयोगाला कळवणार - आयोग

निवडणूक लागलेली नाही तरी मतदान नोंदणी बंद का केली ? - राज ठाकरे

जे आज १८ वय पूर्ण करत आहे, त्यांनी मतदान करू नये का ? - राज ठाकरे

३१ जानेवारी पर्यंत निवडणूक घेण्याचे आपल्याला आदेश आहे. आपण आम्हाला उत्तर द्या की तुम्ही निवडणुकीसाठी सज्ज आहात का ?- राज ठाकरे

दोन दोन ठिकाणी मतदारांचे नाव - राज ठाकरे

मतदार याद्यांमध्ये प्रचंड घोळ - राज ठाकरे

वडिलांचं वय मुलाच्या वयापेक्षा कमी - राज ठाकरे

राज्य निवडणूक आयोगाच्या प्रमुखांना बोलवा, सविस्तर चर्चा होईल - राज ठाकरे

निवडणूक याद्यांमध्ये एवढा घोळ, तुम्ही कसं निवडणुकांना सामोरे जाता ? - राज ठाकरे

मतदान कुणाला जातं हे कळतं नाही - उद्धव ठाकरे

देशात आता कुठेच निवडणुका नाहीत तर ततझरीं आणा - उद्धव ठाकरे

आमच्या पक्षाकडून दिल्लीला आणि महाराष्ट्र आयोगाला पत्र दिले होते. आयोग म्हणतं की पत्रच आले नाही. आमच्याकडे पुरावे आहेत. अनेक घरं अशी आहे जी अस्तित्वात नाही, पण तिथे मतदार असल्याचे - राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील

एखादं सॉफ्टवेअर वापरुन दुबार मतदार मतदार यादीतून बाहेर काढा- राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील

मतदार यादींमध्ये दुरुस्ती करुन निष्पक्ष मतदान घेतले जावे. आम्ही काही दिवसांत तुम्हाला काही पुरावे देणार असून खोटे मतदार हे लाखांच्या घरात असल्याचा दावा - राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील.

## कार्यकर्त्यांना संधी

समाजाभिमुख कार्यकर्त्याला मिळेल, असा विश्र्वास देखील बावनकुळे यांनी व्यक्त केला. दरम्यान, सरकारने हा निर्णय लागू केल्यास नगरपालिका, महापालिका यांप्रमाणे झेडपी अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे.

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेतील ५ आणि पंचायत समितीमधील ०२ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्याची मागणी चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे केली आहे.

ग्रामीण स्तरावर सक्रिय कार्य करणाऱ्या कार्यकत्यांना योग्य प्रतिनिधित्व आणि संधी मिळावी या दृष्टिकोनातून, विद्यमान महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियमामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करता येते. परंतु सध्याच्या धोरणानुसार ह्या संधी मर्यादित स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यामुळे, राज्य शासनाने सदर अधिनियमानुसार सुधारणा करून जिल्हा परिषदेसाठी ०५ (पाच) आणि पंचायत समितीसाठी ०२ (दोन) स्वीकृत सदस्य नेमण्याची तरतूद करावी, असे बावनकुळे यांनी विनंती पत्रात म्हटलं आहे. त्यामुळे समाजाभिमुख कार्य करणाऱ्या, परंतु निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्या पात्र कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिक प्रभावी व सर्वसमावेशक होईल. आपण याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन कार्यकर्त्यांना योग्य प्रतिनिधित्वाची संधी उपलब्ध करून देण्याकामी उपरोक्त सुधारणेबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात, अशी मागणी बावनकुळेंनी पत्राद्वारे केली आहे.

दरम्यान, राज्यात एकीकडे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असून महायुती आणि महाविकास आघाडी एकत्र येऊन निवडणूक लढल्यास अनेक इच्छुकांना संधी मिळणार नाही. त्यातच, पक्षाचे हाडाचे कार्यकर्ते आणि पात्र उमेदवार संधी मिळण्यापासून वंचित राहू नये म्हणून ही सोय करण्यात येत असल्याचे दिसून येते. यापूर्वी नगरपालिका, महापालिकांमध्ये संख्याबळाच्या आधारे स्वीकृत सदस्य घेतले जात आहेत. आता, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्यांची नेमणूक झाल्यास अनेकांना संधी मिळू शकते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### अभिनेत्री रश्मिका मंदाना व अभिनेता आयुष्मान खुराणा साईचरणी लीन



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी:** प्रसिध्द अभिनेत्री रश्मिका मंदाना व अभिनेता आयुष्मान खुराणा यांनी आज शिर्डीत येऊन श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने जनसंपर्क अधिकारी दिपक लोखंडे व मंदिर पर्यवेक्षक म्हाळू सोनवणे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी संरक्षण अधिकारी महेश येसेकर हे उपस्थित होते.

### गांजाची पिके पाच ते सहा फूट उंच; फर्दापूर पोलिसांनी मोठी कारवाई केली




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** छत्रपती संभाजी नगर ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थाविरोधात सुरू असलेल्या मोहीमेदरम्यान, फर्दापूर पोलिसांनी पळसखेडा भागातील एका शेतकऱ्याच्या शेतात कारवाई केली.

पोलीसांना शेतात पाच ते सहा फूट उंच गांजाची झाडे उगवलेली दिसली. ताब्यात घेतल्यावर एकूण १९ किलो १२० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला.

पोलीस सहाय्यक निरीक्षक प्रफुल साबळे यांनी ही माहिती दिली असून, फर्दापूर पोलिसांनी अशा प्रकारच्या अंमली पदार्थाविरोधी कारवायांवर लक्ष ठेवण्याचे सांगितले.

### बीड जिल्ह्यात जिहादी वृत्तीच्या प्रकरणांवर मोर्चा गोपीचंद पडळकर



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी:** बीड जिल्ह्यात जिहादी वृत्तीच्या लोकांशी संबंधित प्रकरणे वाढत असल्याचे विधान परिषद सदस्य गोपीचंद पडळकर यांनी सांगितले. ते म्हणाले की, काही लोक सरकारी जमिनीवर अतिक्रमण करतात, व्यवसाय स्थापन करतात, देशी गाईंची कत्तल करतात आणि तक्रार करणाऱ्यांवर मारहाण करतात. पडळकर यांनी पुढे सांगितले की, काही मुलींना फोर्स लावून पुण्यासारख्या शहरांमध्ये लग्न घालण्यात आले आहे आणि तुरुंग अधिकारी धर्मांतर प्रकरणांत सहभागी आहेत. यासोबतच, बीड कलेक्टर काही प्रकरणांत त्यांचा पाठिंबा देत असल्याचे त्यांनी म्हटले.

लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी मोर्चा काढल्याचे पडळकर यांनी सांगितले. ते म्हणाले, ''सरकार या प्रकरणात अत्यंत जागरूक आहे, आणि मुख्यमंत्री स्वतः याकडे लक्ष देत आहेत. प्रतापगडाच्या पायथ्याचे अतिक्रमण यावेळी काढण्यात आले आहे.'' गोपीचंद पडळकर यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे आणि प्रशासनावर योग्य कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### अमृता रावने सांगितला काळ्या जादूचा किस्सा: अभिनेत्री म्हणाली- 3 मोठे चित्रपट गमावले, साइनिंग अमाउंटही परत करावे लागले

**मुंबई/प्रतिनिधी:** बॉलिवूड अभिनेत्री अमृता रावने अलीकडेच एक धक्कादायक खुलासा केला आहे. तिने खुलासा केला आहे की कोणीतरी तिच्यावर काळा जादू केली होती. तिचे तीन मोठे चित्रपट गमावले आणि तिला तिची साइनिंग रक्कमही परत करावी लागली. रणवीर अलाहाबादियाच्या पॉडकास्टमध्ये, अमृता रावला विचारण्यात आले की तिला कधी काळी जादू करण्यात आली आहे का? अमृता म्हणाली, ''तू का विचारतेस?'' रणवीरने खुलासा केला की त्याच्यासोबतही असे घडले होते.अमृता म्हणाली, ''एक वेळ अशी होती जेव्हा मी माझ्या गुरूंना भेटले. त्यांनी मला आशीर्वाद दिला. मग, एक-दोन दिवसांनी, त्यांनी माझ्या आईशी बोलून तिला सांगितले की कोणीतरी तिच्या मुलीवर जादू केली आहे. हे ऐकून मला धक्का बसला. मी माझ्या आयुष्यात कधीही जादूसारख्या गोष्टींवर विश्वास ठेवला नाही, पण जर माझ्या गुरूंशिवाय इतर कोणी हे सांगितले असते तर मी कदाचित त्यावर विश्वास ठेवला नसता.ती पुढे म्हणाली, मला माहित आहे की तिचे गुरू पूर्णपणे खरे आहेत. त्यांना कोणत्याही गोष्टीचा लोभ नाही, काहीही गमावण्याची भीती नाही.

# माता रमाबाई आंबेडकर व कामराज नगर झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्वतःच्या घरांत राहण्याचे स्वप्न दोन वर्षात पूर्ण होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून झोपडपट्टीधारकांना सर्व सोयी सुविधांयुक्त सुंदर घर मिळणार



**मुंबई :** समूह विकासाच्या माध्यमातून झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनाचे काम हाती घेतले आहे. या माध्यमातून झोपडपट्टीधारकांना सुंदर व सर्व सुविधायुक्त असे घर मोफत देण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होणार आहे. कुणालाही विकास आणि घरापासून वंचित राहू देणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. रमाबाई आंबेडकर व कामराज नगर झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्वतःच्या घराचे स्वप्न केवळ कागदावर राहणार नाही तर दोन वर्षांत या परिसरात आधुनिक, सुसज्ज घरे उभी राहतील, असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई महानगर प्रदेशातील माता रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे भूमीपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार संजय दिना पाटील, आमदार राम कदम, पराग शहा, मिहिर कोटेचा, माजी नगरसेवक परमेश्र्वर कदम आणि स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या ४५ वर्षांपासून विदारक परिस्थितीत राहणाऱ्या रमाबाई आंबेडकर व कामराज नगरमधील नागरिकांच्या स्वप्नातील पुनर्विकास प्रकल्पाचा शुभारंभ झाला आहे. यासंदर्भात अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. विकासकांच्या गुंतागुंतीपासून दूर राहून, हे काम थेट शासकीय संस्थांकडून करायचा निर्णय शासनाने घेतला. एसआरए आणि एमएमआरडीए यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प साकारला जात असून पहिल्यांदाच एमएमआरडीए व एसआरए यांना संयुक्तपणे या प्रकल्पासाठी जोडण्यात आले आहे. राज्य सरकारने दोन वर्षांचे आगाऊ भाडे देऊन येथील नागरिकांना तात्पुरत्या निवासाची सोय करून दिली आहे. आता एमएमआरडीए आणि एसआरए यांनी दोन वर्षांतच हे बांधकाम पूर्ण करावे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समूह पुनर्विकासाची संकल्पना मांडली. त्यांची ही संकल्पना पुढे नेत मुंबईसाठी मोठ्या प्रमाणात समूह पुनर्विकास धोरणास शासनाने मंजुरी दिली आहे. या योजनेद्वारे झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना फक्त घरच नाही, तर खेळाचे मैदान, जिम, शाळा, आरोग्य केंद्र अशा सर्व सोयीसुविधा देऊन पुनर्वसन केले जाईल. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या विचाराची खरी अंमलबजावणी होईल. नफा कमी झाला तरी चालेल परंतु समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून झोपडपट्टी विकास करणार आहोत. यासाठी ५० एकरांचे क्लस्टर शोधून ठेवले आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

समूह पुनर्विकासाच्या माध्यमातून मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे काम आमचे सरकार करत आहे. झोपडपट्टीत राहणाऱ्या बांधवांना सुंदर घराबरोबरच विविध सुविधा पुरविण्याचे काम राज्य शासन हाती घेतले आहे. मुंबईतील सर्वात मोठी झोपडपट्टी असलेल्या धारावीचा पुनर्विकास येत्या सात वर्षांत पूर्ण होणार असून येथील सुमारे १० लाख कुटुंबांना त्यांच्या हक्काचे घर मिळणार आहे. त्याचबरोबर येथील दोन लाख कारागिरांना याच ठिकाणी त्यांच्या कारखान्यासाठी जागा देण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने सांगितलेल्या शेवटच्या माणसाच्या भल्याचा विचार डोळ्यासमोर ठेवून आम्ही काम करत आहोत. हे सरकार समाजाच्या विकासाचा विचार करणारे आहे. विकासाने रोजगार निर्माण होतो. त्यामुळे सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन होते. ते करण्याचे काम आमचे सरकार करत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

पुढील दोन वर्षांत रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथे आधुनिक, सुसज्ज इमारती उभ्या राहतील. या उद्घाटनावेळी पुन्हा आम्हीच उपस्थित राहू, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासोबतच आता त्यांच्या सहचारिणी माता रमाबाई आंबेडकर यांचे स्मारक देखील उभारले जाणार आहे. रमाबाई नगरातील क्लस्टर पुनर्विकास योजनेतून हे स्मारक उभारले जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, गेल्या ४०-४५ वर्षांपासून येथील लोक कठीण परिस्थितीत जगत आहेत. आज त्यांचा खडतर प्रवास संपला आहे. पुढील तीन-चार वर्षांत १७ हजार कुटुंबांचे आयुष्य उजळून निघेल. दिवाळी पुढच्या आठवड्यात असली तरी या रहिवाशांची खरी दिवाळी आजच साजरी झाली आहे.

या योजनेचा प्रयत्न पंधरा वर्षांपासून सुरू आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या काळात सुरुवात झाली, मात्र गती देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात मिळाली. मुख्यमंत्री म्हणून मी या योजनेला पुढे नेले. येथे कोणताही खाजगी बिल्डर नाही; एमएमआरडीएच हा प्रकल्प राबवत आहे. त्यामुळे दर्जेदार घरे वेळेत मिळतील, याची मी खात्री देतो. मी मुख्यमंत्री असताना भाडे वाटपाचे चेक देण्यासाठी आलो होतो. दीडशे कोटी रुपयांचे चेक दिले, त्यानंतर रहिवाशांचा विश्र्वास बसला की घरे नक्की मिळतील, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, रमाबाईनगर आणि कामराज नगर हा परिसर म्हणजे केवळ झोपडपट्टीचा समूह नाही, तर ही जागा संघर्ष, आत्मसन्मान आणि जिद्दीची साक्षीदार आहे. देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईच्या विकासात इथल्या कामगार, कष्टकरी बंधू-भगिनींच्या श्रमाचा आणि घामाचा मोठा वाटा आहे. हा परिसर महाराष्ट्रातील सामाजिक जागृतीचा, परिवर्तनाचा आणि चळवळींचा एक सशक्त केंद्रबिंदू राहिला आहे. माता रमाई आणि के. कामराज यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या भागात आज या प्रकल्पामुळं स्वाभिमानाचं नवं पर्व सुरू होत आहे.

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या दि पिपल्स एज्युकेशन सोसायटी अंतर्गत कार्यरत असलेल्या नऊ शैक्षणिक संस्था आणि दोन वसतिगृहांच्या इमारतींच्या जतन, जिर्णोद्धार आणि संवर्धनासाठी राज्य सरकारने स्वतंत्र योजना तयार करण्यास मान्यता दिली आहे. दरवर्षी १०० कोटी रुपये असे पुढील पाच वर्षांसाठी एकूण ५०० कोटी रुपयांचा निधी या योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. हा निर्णय भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या कार्याला वंदन करणारा आणि समाजातल्या दुर्बल घटकांना बळ देणारा ठरेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

एमएमआरडीएचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाची माहिती दिली. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यांनी आभार व्यक्त केले.

## वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या फेरीसाठी २ हजार ६५० नव्या जागा, महाराष्ट्रामध्ये १५० जागा वाढल्या

**मुंबई/प्रतिनिधी:** वैद्यकीय अभ्यासक्रमाची तिसरी फेरी लांबणीवर पडल्याने विद्यार्थी चिंतीत आहेत. त्यातच आता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने देशात २ हजार ६५० नव्या जागा वाढवल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये १५० नव्या जागांना मान्यता मिळाली आहे. या जागांचा तिसऱ्या फेरीमध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशाची अधिक संधी उपलब्ध होणार आहे.

रुग्णांच्या तुलनेत डॉक्टरांची संख्या कमी आहे. केंद्र सरकारने देशातील डॉक्टरांची संख्या वाढविण्यासाठी नवीन वैद्यकीय महाविद्यालये व जागा वाढविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग दरवर्षी वैद्यकीय महाविद्यालयांसह नवीन जागांना मान्यता देत आहे. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाअंतर्गत असलेल्या वैद्यकीय समुपदेशन समितीने (एमसीसी) तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक लांबणीवर टाकल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

त्यातच आता एमसीसीने वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये देशात २ हजार ६५० जागा वाढवल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील १५० जागांचा समावेश आहे. नव्याने मान्यता मिळालेल्या या जागांमुळे देशातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांची संख्या १ लाख २६ हजार ७२५ इतकी झाली आहे. हरियाणा, राजस्थान आणि तामिळनाडूमध्ये सर्वाधिक जागा वाढल्या आहेत. या तिन्ही राज्यांमध्ये प्रत्येकी ३०० जागांना मान्यता मिळाली आहे. त्याखालोखाल आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये प्रत्येकी २५० जागा वाढल्या आहेत.

महाराष्ट्रामध्ये १५० जागांना मान्यता मिळाली आहे. यामध्ये नागपूरमधील दत्ता मेघे वैद्यकीय महाविद्यालयामध्ये १०० आणि सोलापूरमधील अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयमध्ये ५० जागांना मान्यता मिळाली आहे. या सर्व जागांचा समावेश तिसऱ्या फेरीमध्ये करण्यात येणार आहे. त्यामुळे वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अधिक जागा उपलब्ध होणार असून तिसऱ्या फेरीमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळणार आहे.

या राज्यांमध्ये जागांमध्ये वाढ

आंध्र प्रदेश २५०, छत्तीसगड १००, गुजरात २५ , हरियाणा ३००, हिमाचल प्रदेश ५०, कर्नाटक ३५०, मध्य प्रदेश ५०, महाराष्ट्र १५०, ओडिशा १००, राजस्थान ३००, तामिळनाडू ३००, तेलंगणा १५०, उत्तरप्रदेश २५०, उत्तराखंड १००, पश्चिम बंगाल १७५

एम्स रुग्णालयांमध्ये १०० जागा वाढल्या

राज्यातील विविध महाविद्यालयामध्ये जागा वाढल्या आहेत. यामध्ये गुजरात आणि हिमाचल प्रदेशमधील दोन एम्स रुग्णालयांमध्ये प्रत्येकी ५० जागा वाढल्या आहेत.

## मेहंदी जिहाद विरोधात मर्जिया पठाणचा ठोस प्रत्युत्तर; मुंब्र्यात मेहंदी सेमिनार आयोजित

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी:** काही हिंदूत्ववादी आणि मूलतत्ववादी संघटनांनी 'मेहंदी जिहाद' असा दुष्प्रचार करत मेहंदी कलाकारांविरोधात मोहीम सुरू केली होती. या प्रकाराला उत्तर देण्यासाठी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा मर्जिया शानू पठाण यांनी मुंब्र्यात मेहंदी सेमिनार आयोजित करून सामाजिक समानतेचा संदेश दिला.

मध्य प्रदेशात करवा चौथच्या निमित्ताने अनेक महिला हातावर मेहंदी काढण्यासाठी कलाकारांच्या दुकानात गेल्या होत्या. मात्र, काही संघटनांनी मुस्लीम युवकांच्या हातात हिंदू महिलांनी हात देऊ नये, असे म्हणत विरोध केला आणि काही दुकाने बंद करण्याचा प्रयत्नही केला.

या पार्श्वभूमीवर मर्जिया पठाण यांनी मेहंदी सेमिनार आयोजित करून द्वेष पसरविणाऱ्यांना सार्वजनिक पद्धतीने प्रत्युत्तर दिले. त्यांनी या उपक्रमाद्वारे सांस्कृतिक सहिष्णुता, सामाजिक समता आणि विविधतेचा सन्मान राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. मर्जिया पठाण म्हणाल्या, ''कोणत्याही गैरधर्मियांच्या हातात हात देऊन मेहंदी काढणे थांबविण्याचा दुष्प्रचार आम्ही मान्य करणार नाही; हा उपक्रम समाजात सकारात्मकता आणि सौहार्द वाढविण्यासाठी आहे.''

# जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रारूप आरक्षणाबाबत अधिसूचना प्रसिद्ध

## प्रारुप आरक्षणावर हरकती व सुचनांसाठी १७ ऑक्टोबरपर्यंत मुदत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती सभापती व सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत सोमवारी काढण्यात आली असून या प्रारुप आरक्षणाबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या प्रारूप आरक्षणाची अधिसूचना जिल्ह्यातील क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आली असून या प्रारूप आरक्षण अधिसूचनेबाबत जनतेच्या काही हरकती असल्यास, त्यांनी त्या जिल्हाधिकारी बुलडाणा यांचेकडे १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

बुलढाणा जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी त्या जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व पंचायत समित्यांमधील निर्वाचक एकूण सदस्य संख्या, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच स्त्रियांकरिता राखून ठेवण्यात आलेले निवडणूक विभाग व निर्वाचक गणाबाबत प्रारुप आरक्षणाच्या अधिसूचनेची प्रत जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील फलकावर, जिल्हा परिषद कार्यालयातील फलकावर तसेच तहसिलदार बुलढाणा, चिखली, देऊळगावं राजा, मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, खामगांव, शेगांव, जळगांव जामोद, संग्रामपूर, नांदुरा, मलकापूर व मोताळा यांचे कार्यालयातील फलकावर आणि पंचायत समिती बुलढाणा, चिखली, देऊळगावं राजा, मेहकर, लोणार, सिंदखेड राजा, खामगांव, शेगांव, जळगांव जामोद, संग्रामपूर, नांदुरा, मलकापूर व मोताळा कार्यालयातील फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.



प्रारुप आरक्षण आदेशाच्या मसुद्यास कुणाची हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सकारण लेखी निवेदने, हरकती व सूचना जिल्हाधिकारी यांचेकडे १७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सादर करावेत. या तारखेनंतर जिल्हाधिकारी यांच्याकडे आलेली निवेदने, हरकती व सूचना इत्यादी विचारात घेतले जाणार नाहीत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या समस्या दुर्लक्षित; बच्चू कडूंचा सरकारवर आरोप

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलढाणा/प्रतिनिधी** : विदर्भातील शेतकरी नेते बच्चू कडू यांनी सरकारवर जोरदार टीका करत म्हटले आहे की, ''सरकारने सर्वांना जातीच्या भांडणात गुंतवून ठेवलंय.'' ते म्हणाले की शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर सरकारची दुर्लक्षाची पद्धत नैसर्गिक आपत्तींपेक्षा अधिक संकट निर्माण करत आहे.

कडू म्हणाले की, शेतकऱ्यांना हमीभावाच्या अभावी मोठा फटका बसत आहे. ''सोयाबीनचा हमीभाव ५,३२८ रुपये असूनही शेतकऱ्यांना ३,००० रुपयांनाच विकावे लागते. यामुळे पिक कमतरतेसह भावही कमी झाले आहेत,'' असे ते म्हणाले. त्यांचा आरोप आहे की राज्यात खरेदी केंद्र सुरू नसल्यामुळे पंजाबप्रमाणे ९० टक्के माल हमीभावात खरेदी होत नाही; आपल्याकडे तर १० टक्क्याही नाही.

मुंबई कार्यालयातील घडामोडींवर बोलताना कडू म्हणाले, ''साप पकडल्यावर जहर सोडतो तशाच प्रकारची परिस्थिती आहे. आम्ही चूप न बसता आंदोलन करत आहोत, त्यामुळे त्याचे परिणाम भोगावे लागतात.'' स्वीकृत सदस्यांच्या नेमणुकीबाबत ते म्हणाले, ''एखाद्या दिव्यांग किंवा विधवा भगिनींना प्रतिनिधी म्हणून घ्या. फक्त राजकीय ताळमेळीसाठी याचा वापर करू नका.''

महाविकास आघाडी शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाची भेट दिल्याबाबत कडू म्हणाले, ''पाप काँग्रेसने ईव्हीएम मशीन आणली नसती तर हा वटवृक्ष तयार झाला नसता. त्यामुळे आमचे घर उध्वस्त झाले आहे. मी मागेही व्हीव्हीपॅटवर मतमोजणी करण्याची मागणी केली होती.''

महाएल्गार सभेबाबत कडू म्हणाले की, ''सभेद्वारे सरकारला विनंती करू, नंतर काय करायचे ते पाहू. न्याय मिळाला नाही तर मुक्कामी राहू.''

शेतकरी परिस्थितीवर त्यांनी भर दिला: ''रत्नागिरीतील आंबा उत्पादक शेतकरीही संकटात आहे. पिकवणारा शेतकरी सध्या सर्वात दुखी आहे. पूजेला ब्राह्मणाचा हात लागला की ते पवित्र होतो; शेतकऱ्याचा हात लागला तर स्वस्त, आणि व्यापाऱ्याचा हात लागला तर महाग अशी अवस्था आहे.''

शेवटी कडू म्हणाले की, ''नैसर्गिक आपत्तीमध्ये आम्ही मदत मिळतो, परंतु पिकांचे नुकसान आणि भाव कमी झाल्यावर शेतकऱ्याची परिस्थिती विद्यार्थ्यांच्या मेरिटमध्ये अन्यायासारखी आहे. आमचा शेतकरी जागृत नाही, तो जात-पात आणि धर्माच्या झेंड्यामध्ये खुश आहे. सरकारने सर्वांना जातीच्या भांडणात गुंतवून ठेवलंय.''

जर हवे असेल, तर मी त्याच मुद्द्यांवर संक्षिप्त २०० शब्दांची पेपरसाठी टाईटल आणि लीडसह खबर पण तयार करू शकतो. तुम्हाला ते हवे का?

## विविध वृत्त...

### सैनिकी कल्याण विभागात लिपिक टंकलेखक पदांची भरती

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील लिपिक टंकलेखक (गट-क) एकूण ७२ पदांकरिता माजी सैनिक उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छुक माजी सैनिक उमेदवारांनी दि. ५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

वरिल पदांपैकी एक पद हे अंपग संवर्गातून किमान ४० टक्के अंपगत्व असलेल्या उमेदवारामधून दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्ये व जबाबदारीचा विचार करुन गुणवत्ता/उपलब्धतेनुसार भरण्यात येईल. सदर भरती प्रक्रिया टीसीएस-आयओएन (T.C.S-ION ) मार्फत होणार आहे. परिक्षेसाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. पात्र उमेदवाराना वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज (www.mahasainik.maharashtragov.in) या संकेतस्थळावर (Resources Tab Recruitment Tab) येथे विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहिल. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल, याची नोंद घ्यावी.

### सेसफंड योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून 30 नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागविले

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : जिल्हा परिषद सेसफंड योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये थेट लाभ हस्तांतरण योजनेतुन ७५ टक्के अनुदानावर ५ एचपी मोटरपंप संच, पॉवर ऑपरेटेड स्प्रेअर्स, बॅटरी ऑपरेटेड स्प्रेअर्स, मानवचलीत स्पायरल सीड सेपरेटर, विद्युत चलीत चाफ कटर, मानवचलीत टोकनयंत्र (डिबलर) साहीत्य पुरविणे प्रस्तावीत आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहे. अधिक माहिती करीता संबंधित तालुक्यातील पंचायत समितीमधील कृषि विभागात कृषि अधिकारी (सामान्य) तसेच विस्तार अधिकारी (कृषि) यांचेकडे संपर्क साधावा. तसेच योजनेअंतर्गत विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे दि. ३० ऑक्टोंबर २०२५ पर्यत सादर करावे, असे आवाहन जिल्हा परिषद कृषि विकास अधिकारी यांनी केले आहे.

### मंकी पॉक्सच्या रुग्णाच्या संपर्कात गेलेल्यांचे आवाहल निगेटिव्ह; मनपा आरोग्य प्रशासनाची माहिती



**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी** : मंकी पॉक्स झालेल्या रुग्णाला तात्काळ वेळेवर उपचार मिळाल्याने त्याची प्रकृती सध्या स्थिर आहे तसेच धुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून या रुग्णाच्या संपर्कात आलेल्या नागरिकांचे देखील रक्ताचे नमुने तपासणीसाठी पुणे येथे पाठवण्यात आले होते. त्या सर्वांचे अहवाल हे निगेटिव्ह आले असून ज्या परिसरात राहत होता त्या परिसरात आरोग्याच्या सर्वच उपाय योजना राबवल्या जात आहे त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता अशी काही लक्षणे आढळल्यास तात्काळ धुळे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन डॉक्टर संपदा कुलकर्णी महानगरपालिका आरोग्य विभाग प्रमुख यांनी केले आहे.

## इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या नवीन कार्यालयाचे १५ ऑक्टोबरला उद्घाटन

**बुलढाणा/प्रतिनिधी** : इंडियन रेड क्रॉस सोसायटी या सेवाभावी संस्थेच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन व सेवाकार्याचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि. १५) दुपारी ३ वाजता टीबी हॉस्पिटल (क्षय आरोग्य धाम) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडणार आहे.

या सेवाभावी संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रिडा व युवक कल्याण राज्यमंत्री ना.रक्षाताई खडसे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मदत व पुनर्वसन मंत्री तथा पालकमंत्री ना.मकरंद जाधव, वस्त्रोद्योग मंत्री तथा सह पालकमंत्री, ना.संजय सावकारे, कामगार मंत्री ना.आकाश फुंडकर हे राहणार आहेत. विधान परिषद सदस्य किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे, विधानसभा सदस्य आ.चैनसुख संचेती, आ.डॉ संजय कुटे, आ. संजय गायकवाड, आ.श्वेताताई महाले, आ.सिद्धार्थ खरात, आ.मनोज कायंदे यांची विशेष अतिथी म्हणुन उपस्थिती राहणार आहे.

तसेच इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे पदसिद्ध अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, जिल्हा पोलिस अधीक्षक नलिश तांबे, जिल्हा शल्य चिकित्सक तथा पदसिद्ध उपाध्यक्ष (इंडियन रेड क्रॉस सोसायटी) डॉ. दत्तात्रय बिराजदार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील, बुलडाणा अर्बन अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, दिव्यांग व पुनर्वसन संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेश छाजेड, भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन चे सचिव अनिल नावंदर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र काळे, बुलढाणा नगर परिषदेचे मुख्याधिकारी गणेश पांडे, क्षय आरोग्य धाम चे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुशील चव्हाण, डॉ. दीपक लध्दड, आयएमएचे डॉ. केदार शर्मा, डॉ. अजित शिरसाठ, निमा संघटनेचे डॉ.गजानन पडघान, आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ चे डॉ. राजेश्वर उबरहंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाला सर्व समाजसेवी संस्थाचे पदाधिकारी व नागरीकांना उपस्थित राहण्याचे आवाहन इंडियन रेड क्रॉस सोसायटी बुलढाणाचे कार्याध्यक्ष विनोद जवरे, उपकार्याध्यक्ष अ‍ॅड. जयसिंग देशमुख, सचिव रवींद्र लहाने, कोषाध्यक्ष विकास दळवी आदींनी केले आहे.

## ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी काढा, अन्यथा शासकिय योजनांचा लाभ मिळणार नाही

**दैनिक आपला विदर्भ**



**बुलढाणा/प्रतिनिधी** :ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच निर्मिती आणि शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी ॲग्रिस्टॅकअंतर्गत आपला शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) आपल्या जवळच्या सीएससी सेंटरवर जावून तात्काळ तयार करुन घ्यावा. फार्मर आयडी नसल्यास शासकिय योजनांचा लाभ मिळणार नाही, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

शेतकरी माहिती संच तयार करण्यासाठी प्रकल्पाची अमंलबजावणी जिल्हयात दिनांक १२ डिसेंबर २०२४ पासून कॅम्प मोडमध्ये तसेच दिनांक २१ जानेवारी २०२५ पासुन नागरी सुविधा केंद्र आणि कॅम्प या हायब्रिड मोडव्दारे करण्यात आली आहे. सदर मोहिम अंतर्गत जिल्हयात दि. १५ ऑक्टोबर २०२५ अखेर ४,५६,८१० शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात आले आहे.

जिल्ह्यात पी.एम. किसान योजनेचे एकूण ४,३४,४६८ लाभार्थी आहेत त्यापैकी आजअखेर ३,३२,६०१ लाभार्थ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात आले आहे. तरी उर्वरित १,०१,८६७ शेतकऱ्यांनी तात्काळ शेतकरी ओळख क्रमांक तयार करुन घ्यावे, अन्यथा आपल्याला पी. एम. किसान योजनेचा लाभ मिळणार नाही.

जिल्ह्यातील सर्व संयुक्त खातेदार व सामाईक खातेदार यांनी प्रत्येक सहधारकांचा शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करुन घ्यावा. या ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक असून तो असेल तरच शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यात येणार आहे आणि लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरणाची (ई-केवायसी) आवश्यकता राहणार नाही. ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सातबारा आधारला लिंक करायचा आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना एक फार्मर आयडी मिळेल, फार्मर आयडी बनवला नाही तर पीक विमा, पीक कर्ज. पीएम किसान व विविध पीक अनुदान यांचा लाभ मिळणार नाही.

२९ एप्रिलचे शासन परिपत्रक तसेच १० ऑक्टोबरच्या शासन निर्णयानुसार ज्या शेतकऱ्याचे ॲग्रिस्टॅकमध्ये नोंदणी होवून ॲग्रिस्टॅकमध्ये ई केवायसी झाली आहे अशा शेतकऱ्यांची माहिती डीबीटी प्रणालीवर भरलेल्या माहितीशी जुळत असलेल्यांना मदत मिळणे सुलभ व सुकर होण्यासाठी (डिबीटीव्दारे मदत वितरणासाठी आवश्यक) ईकेवायसी प्रक्रियेपासून सुट देण्यात येत आहे असे निर्देश आहेत.'' त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी ॲग्रिस्टॅकअंतर्गत आपला शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) आपल्या जवळच्या सीएससी सेंटरवर जावून तात्काळ तयार करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

## दिवाळी फराळ परदेशात पाठवण्याची टपाल खात्याची खास योजना

### परदेशी नातेवाईकांना घरच्या खमंग फराळाचा आनंद द्या



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : दिवाळीच्या सणाला सलाम करत टपाल खात्याने परदेशात राहणाऱ्या नातेवाईकांसाठी खास सुविधा सुरु केली आहे. यंदा घरगुती फराळ परदेशात पाठवणे अधिक सोपे, जलद आणि सुरक्षित झाले आहे.

टपाल खात्याने रजिस्टर पोस्ट आणि स्पीडपोस्ट या दोन सेवांचा विलिनीकरण करून नवीन एकत्रित सेवा सुरु केली आहे. या सेवेसाठी नवीन दरपत्रक लागू केले गेले असून, ग्राहकांना सेवा घेणे अधिक सुलभ होईल.

**योजनेची मुख्य वैशिष्ट्ये**

१९२ देशांमध्ये उपलब्ध: अमेरिका आणि कॅनडा वगळता, जवळपास सर्व प्रमुख देशांमध्ये फराळ पाठवता येईल.

**विशेष दरपत्रक**

प्रत्येक देशासाठी वेगळे दरपत्रक आणि पॅकेजिंग नियम लागू.

**सहाय्यक काऊंटर**

शाखा पोस्टमास्तर सरवार शाह यांनी ग्राहकांना मार्गदर्शनासाठी विशेष काऊंटर उभारला आहे.

सुरक्षित आणि जलद सेवा: पार्सल सुरक्षितपणे पोहोचतील आणि वेळेत वितरण होईल.

शाखा पोस्टमास्तर सरवार शाह म्हणतात, ''दिवाळीच्या सणाला परदेशात राहणाऱ्या नातेवाईकांना घरच्या खमंग फराळाचा गोड अनुभव पाठवण्याची ही उत्तम संधी आहे. नागरिकांनी या सेवेचा नक्की लाभ घ्यावा.''

टपाल खात्याच्या या योजनेमुळे दिवाळीचा आनंद आता केवळ घरच्या मंडळींपर्यंत मर्यादित राहणार नाही, तर आपल्या प्रियजनांपर्यंत खमंग फराळ पोहोचवून सण आणखी गोड करता येईल.

## कल्याण एस.टी. आगारात चोरट्यांचा सुळसुळाट; महिला प्रवाशांच्या बांगड्या, मोबाईलवर डल्ला

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण पश्चिमेतील रेल्वे स्थानकाजवळील राज्य परिवहन महामंडळाचे एस. टी. बस आगार, बाजुचा वल्लीपीर रस्ता भुरट्या चोरट्यांचे आश्रयस्थान झाले आहे. दररोज बस आगारातील ज्येष्ठ महिला प्रवाशांच्या हातामधील सोन्याच्या बांगड्या, प्रवाशांच्या हातामधील मोबाईल चोरण्याचे प्रमाण वाढले आहे. सोमवारी संध्याकाळी एका प्रवाशाचा महागडा मोबाईल चोरट्यांनी लांबवला. आपला महागडा मोबाईल गायब होताच, अस्वस्थ झालेल्या कल्याण पूर्वेतील चक्कीनाका चेतन हायस्कूल परिसरात राहणाऱ्या संतोष साळवे या नागरिकाने कल्याणहून वाशीकडे जाणाऱ्या वातानुकूलित बसला धावपळ करत रोखून धरले. घटनास्थळी पोलिसांना पाचारण केले.

## कामक्षा देवी महाविद्यालयाचा शुभम शिरसाठ वुशू स्पर्धेत राज्यस्तरावर द्वितीय

**दैनिक आपला विदर्भ**

**किनगांव राजा/प्रतिनिधी:** कामक्षा देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय किनगांव राजा शाळेतील विद्यार्थी शुभम रवींद्र शिरसाठ यांनी राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.महाराष्ट्र राज्य क्रीडा संचालनय पुणे यांच्यामार्फत राज्य स्तरीय वूशू स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल छत्रपती संभाजी नगर येथे राज्यस्तरीय वुशू स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

राज्यातील ८ विभागांचे खेळाडू वुशू स्पर्धेत सहभागी झाले होते. शुभम रवींद्र शिरसाठ यांने १९ वर्ष वयोगटामध्ये ६० किलो वजन गटामध्ये वुशू स्पर्धेत अमरावती विभागाकडून प्रतिनिधित्व केले आहे.शेवटचा सामना लातूर विभाग व अमरावती विभागांचा अटीटटीच्या सामना झाला आहे. शेवटच्या काही सेकंदामध्ये लातूर विभागा खेळाडू विजयी झाला.

राज्य स्तरीय वुशू स्पर्धेत द्वितीय आलेल्या वुशू स्पर्धेतमध्ये विजयी विद्यार्थ्यांचे स्वागत व अभिनंदन शाळेचे अध्यक्ष शिवाजीराव काळुसे यांनी केले आहे.




राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केलेला खेळाडू व उपस्थित क्रीडा शिक्षक

यावेळी प्राचार्य उद्धव दराडे, प्रल्हाद काळुसे, सुनील काकड, सहाय्यक शिक्षक रामदास सानप,प्रकाश सोनुने, संजय केकान, गजानन मुंढे, राजीव मांटे, नितीन खरात,गजानन थीगळे, संजय काळुसे, उद्धव राठोड, धम्मपाल गवई, गोपाल पवार,गणेश काळुसे, रामेश्वर हरकळ, गजानन काळुसे, दत्तू दांडगे,राजु चंदवडे,सत्यम जगदाळे, उद्धव हरणे,वैभव जौक, अर्जुन अवताडे यांच्यासह क्रीडा शिक्षक आदीजण उपस्थित होते.